# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

**सामान्यकाळातील १४ वा रविवार** (श्रद्धाबांधणी रविवार) ३० जून २०१९

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरूः** ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची धुरा वाहणारे पोप फ्रान्सिस, सर्व महागुरू, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना समाजातील उपेक्षित जनतेपर्यंत श्रद्धाबांधणी कार्य करण्यासाठी प्रभूची कृपा व सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपले राजकीय पुढारी व शासकीय नेत्यांनी तळागाळातील उपेक्षित जनतेपर्यंत जाऊन त्यांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. 'पिक भरपूर आहे, कामकरी मात्र थोडे आहेत' हा शुभवर्तमानातील संदेश लक्षात घेऊन तरूण तरूणींना इश्वरी हाकेची ओळख होण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ख्रिस्तसभेपासून दुरावलेल्या भाविकांनी प्रभूच्या कळपात परत यावे, एक मेंढपाळ, एक कळप म्हणून आपण श्रद्धेमध्ये दृढ व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर प्रभूच्या कृपेचा वर्षाव व्हावा, जे आजारी आहेत, परगावांत, परदेशांत आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे, ह्या हंगामात आपल्याला आवश्यक असलेला पाऊस पुरेशा प्रमाणात मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वेयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे पित्या तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाया सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.